**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ३३ दिनांक ०२/०७/२०२४**

# पालघर पोलीस दलाकडून नवीन फौजदारी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन

सन २०२० मध्ये भारतात लागू असलेल्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी डॉ. रणबीर सिंग यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. त्याअनुषंगाने भारतीय दंड विधान संहिता (IPC) ऐवजी भारतीय न्याय संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता (CRPC) ऐवजी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा अधिनियम ऐवजी भारतीय साक्ष अधिनियम असे तीन कायदे सन २०२३ साली संमत केले आहेत. सदर तीनही नवीन कायद्याची अंमलबजावणी दि.०१/०७/२०२४ रोजी पासून सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने सदर तीनही कायद्याची माहिती व ओळख सर्व क्षेत्रात व्हावी या हेतूने देशात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ व भारतीय साक्ष अधिनियम २०२३ या तीनही नवीन कायद्याची माहिती व ओळख निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास श्री. संजय दराडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, मोक्का कोर्ट ठाणे येथील सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मोरे, पालघर न्यायालयातील सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सावंत तसेच पालघर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे हजर होते. सदर कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व प्रतिष्ठित नागरीक, पोलीस पाटील, पत्रकार बांधव, सोनोपंत दांडेकर विधी महाविद्याल, पालघर व आयडियल विधी महाविद्यालय, वाडा येथील विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमप्रसंगी वरील सर्व मान्यवरांनी जुन्या व नवीन कायद्यातील बदल, जुन्या व नवीन कायद्यामधील कलमांची तुलनात्मक माहिती, नवीन कायद्याची गरज व भुमिका या सर्व विषयाबाबतची माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रमाची सांगता भारताचे राष्ट्रगीताने झाली. वरील कार्यक्रम हा श्री. संजय दराडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पार पडला.